प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २३ जुलै २०२४**

## सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेस लाभला अभूतपूर्व प्रतिसाद

## अनेक व्यावसायिकांचे नवी मुंबईमध्ये व्यवसाय वृद्धीचे स्वप्न झाले साकार

सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्री योजनेस व्यावसायिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून दिनांक २३ जुलै २०२४ रोजी सिडको भवन येथे या योजनेची संगणकीय सोडत काढण्यात येऊन योजनेचा निकाल जाहीर करण्यात आला.

**“सर्वसामान्य नागरिकांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याबरोबरच विकासक, उद्योजक, व्यावसायिक अशा विविध घटकांच्या हिताकरिता सिडकोतर्फे नेहमीच विविध योजना राबविण्यात येतात. सदर २४३ दुकानांच्या विक्री योजनेद्वारे अनेक व्यावसायिकांना वेगाने विकसित होणाऱ्या व उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमध्ये आपल्या व्यवसायाची वृद्धी करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या योजनेला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे सिडकोबद्दल नागरिकांच्या मनात असलेल्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब झाले आहे.”**

**श्री. विजय सिंघल**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडकोतर्फे १४ मार्च २०२४ रोजी सिडकोच्या बामणडोंगरी गृहसंकुलातील २४३ दुकानांच्या विक्रीची योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेद्वारे रस्ते, रेल्वे, अटल सेतू (एमटीएचएल) यांद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या उलवे नोडमधील बामणडोंगरी गृहसंकुलातील ही दुकाने विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सिडकोचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उलवे नोडच्या नजीकच्या परिसरामध्ये आकारास येत आहे.

सिडकोच्या गृहनिर्माण योजनांची विश्वासार्हता आणि उलवे नोडसारख्या परिसरामध्ये मिळालेली व्यवसाय वृद्धीची संधी यांमुळे या योजनेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. लहान, मध्यम व मोठ्या

आकाराची दुकाने उपलब्ध असल्याने मोठ्या व्यावसायिकांप्रमाणेच लघु व मध्यम व्यावसायिकांकरिताही ही योजना लाभदायी ठरली आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**